## मानक ३५

**१.७.७ समृद्ध अध्ययन अनुभवासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या आपापसातील भेटींचे आयोजन केले जाते.**

## निवडलेला स्तर : ४

**१.१ शाळेकडे शेजारच्या शाळा/ शैक्षणिक संस्था आणि अंगणवाड्यांसोबत शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या आपापसातील भेटींचे नियोजन केले आहे.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात शेजारच्या शाळा/ शैक्षणिक संस्था बरोबर शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या आपापसातील भेटींचे नियोजन केले जाते. या भेटीमुळे दोन्ही संस्थामधील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होतो.

**२.१ शिक्षक जवळच्या शाळांसोबत अध्ययन अध्यापन अनुभव देवाणघेवाण कार्यक्रम आयोजित करतात.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक जवळच्या शाळांसोबत अध्ययन अध्यापन अनुभव देवाणघेवाण कार्यक्रम आयोजित करतात यामधून विद्यार्थ्यांच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठी मोठ्या प्रमाणात फायदा होतो.

**३.१ आजूबाजूच्या शाळा/ शैक्षणिक संस्था आणि अंगणवाड्या यांच्या सहकार्याने अनेक संयुक्त उपक्रम राबवले जातात, जसे की संयुक्त क्रीडा दिन, कला प्रदर्शन, इको क्लब आणि विद्यार्थ्यांसाठी इतर विषय मंडळे हॅकाथॅन संघ विज्ञान प्रदर्शने, एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रम इत्यादी.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालय आजूबाजूच्या शाळा/ शैक्षणिक संस्था यांच्या सहकार्याने अनेक संयुक्त उपक्रम राबवते, जसे की संयुक्त क्रीडा दिन, कला प्रदर्शन इत्यादी उपक्रम राबवले जाते.

**४.१ शाळेने आजूबाजूच्या शाळा / शैक्षणिक संस्था आणि अंगणवाड्यांमधील आणि विद्यार्थी दोघांच्या अध्ययन अध्यापन अनुभूतींची देवाण-घेवाण केल्याने फायदा झाला आहे.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयात आजूबाजूच्या शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थी या दोघांच्या अध्ययन अध्यापन अनुभूतीची देवाण-घेवाण केल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झालेला आहे. कनिष्ठ महाविद्यालय मध्ये स्कूल कनेक्ट प्रोग्रॅम घेण्यात आला.



**चिंतामणी कनिष्ठ महाविद्यालयाला भेट**




**अध्ययन अध्यापन अनुभव देवाणघेवाण कार्यक्रम**




**क्रीडा दिन साजरा**





कला प्रदर्शन




स्कूल कनेक्ट प्रोग्रॅम




# इंदिरा महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रम

यवतमाळ सत्ता । प्रतिनिधी

**कळंब** :राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार होणाऱ्या शैक्षणिक बदलांबाबत संपूर्ण कळंब तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने इंदिरा महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट' हा कार्यक्रम बुधवार दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य शासन निर्णयानुसार 'स्कूल कनेक्ट' हे संपर्क अभियान राज्यातील महाविद्यालयांतील स्थूल नोंदणी प्रमाण वाढविण्याच्या हेतूने आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदींविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने विद्यापीठामार्फत त्यांच्या परिक्षेत्रात राबविण्याचा निर्णय घेतला होता, त्या अनुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशांनुसार हा कार्यक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पवन मांडवकर होते. तज्ञ प्रशिक्षक प्रा. प्रशांत जवादे यांनी पीपीटीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. वीरा मांडवकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. माधुरी राखुंडे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. सखाराम सांगळे यांनी केले. कार्यकामची सुरुवात विद्यापीठ गीताने तर सांगता राष्ट्रगीताने झाली. सदर कार्यक्रमास कळंब तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयांतील बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाकरिता काही कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकही उपस्थित होते. कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील विविध सुसज्ज विभाग आणि प्रयोगशाळा यांना प्राचार्य आणि विविध विभागाचे प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनांतर्गत विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या आणि माहिती घेतली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील पर्यवेक्षक प्रा. लांजेवार, प्रा. भुरके, प्रा. जाधव तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

Principal
Indira Mahavidyalay, Kalamb
Dist.Yavatmal